समाज कल्याण संचालनालय
महाराष्ट्र राज्य, पुणे-१
आवक क्रमांक 968 दिनांक 2013/09

अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेची नियमावलीत सुधारणा.

महाराष्ट्र शासन
सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक-इबीसी २००८/प्र.क्र.६२/मावक-२
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : १७ मार्च, २००९.

संदर्भ : १) शासन पत्र क्र.इबीसी-२००३/प्र.क्र.४५०/मावक-२, दि.२९/९/२००३.
२) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.No.११०१४/२८२००२/SCD-V दि.३०/१०/२००३.
३) शासन परीपत्रक क्र.इबीसी-२००८/प्र.क्र.६२/मावक-२.दि.१५/५/०८ व १२/१२/०८.
४) सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय,नवी दिल्ली यांचे पत्र क्र.No.११०१४/२८/२००७/SCD-V दि.२१/०१/२००९.

## परिपत्रक

अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या इयत्ता १ ली ते १० वीत शिकत असलेल्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती देण्याची योजना राबविण्यात येते. सदर योजना परंपरागत अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना सदर शिष्यवृत्ती लागू आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत असून यासाठी उत्पन्नाची कोणतीही अट नाही. या योजनेची नियमावली सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या उपरोक्त दिनांक ३०/१०/२००३ अन्वये विहित करण्यात आलेली आहे. योजनेचे सुधारित दर उपरोक्त दिनांक २९/९/२००३ च्या पत्रांन्वये कळविण्यात आलेले आहेत. योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात क्षेत्रिय अधिका-यांमध्ये संभ्रम निर्माण झालेला होता. त्यामुळे योजनेच्या अंमलबजावणी संदर्भात उपरोक्त दिनांक १५/५/२००८ व १२/१२/२००८ च्या परिपत्रकान्वये मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या आहेत. केंद्र शासनाच्या उपरोक्त दिनांक २१/०१/२००९ च्या पत्रान्वये या योजने अंतर्गत शिष्यवृत्तीचे दर, वार्षिक तदर्थ अनुदान, केंद्रिय अनुदानाचा हिस्सा व योजनेसाठी पात्रतेबाबत सुधारणा करण्यात आलेली आहे. या सुधारणा दिनांक १/४/२००८ पासून लागू करण्यात आल्या आहेत.

२. अस्वच्छ व्यवसायात काम करणा-या पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती योजनेत खालील प्रमाणे सुधारणा केलेली आहे :

| बाब | सद्याचे दर | | | सुधारित दर ( १/४/२००८ पासून ) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| दरमहा शिषवृत्तीचे दर | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे | वर्ग | वसतिगृहात न राहणारे | वसतिगृहात राहणारे |
| | १ ली ते ५ वी | ४० | -- | १ ली ते २ री | ११० | - |
| | ६ वी ते ८ वी | ६० | -- | ३ री ते १० वी | ११० | ७०० |
| | ३ री ते ८ वी | - | ३०० | | | |
| | ९ वी ते १० वी | ७५ | ३७५ | | | |
| वार्षिक तदर्थ अनुदान | | रु. [illegible]५०/- | रु.६००/- | | रु.७५०/- | रु.१०००/- |
| केंद्रिय अनुदान | बांधिल खर्चावरील खर्चाच्या ५०% | | | बांधिल खर्चावरील खर्चाच्या १००% | | |
| पात्रता | १) मेहेतरकाम करणा-या (scavengers ) अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंधित असलेले सफाईगार, कातडी सोलणे या व्यवसायात गुंतलेल्या व्यक्तिंच्या पाल्यांना अनुज्ञेय.<br>२) सदर योजनेच्या लाभासाठी इयत्ता आठवी पर्यंत अपत्य संख्या मर्यादेचे बंधन नाही. तथापि, अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या दिनांक १/४/१९९३ व त्यानंतरच्या तिस-या अथवा त्यानंतरच्या अपत्याचा जन्म झाला असल्यास त्याच्या केवळ दोन मुलांना सदर योजनेचा लाभ मिळेल. इयत्ता नववी व दहावी साठी अस्वच्छ व्यवसायातील पालकाच्या केवळ दोन मुलांनाच लाभ अनुज्ञेय राहिल. | | | १) हाताने मेहेतर काम (manual scavengers) करणा-या/मानवी विष्ठाचे वहन करणा-या, व्यक्ती किंवा बंदिस्त व उघडया गटाराची साफसफाई करणा-या व्यक्ती.<br>२) अस्वच्छ व्यवसायाशी संबंध परपरेने असलेले सफाईगार.<br>३) कातडी कमावणारे (tanners )<br>४) कातडी सोलणारे. (flayers )<br>५) मेहेतर काम करणा-या व्यक्तिंचे पुर्नवसन (Rehabilitation of Manual Scavengers) योजने अंतर्गत लाभ घेण्यापूर्वी अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या जन्म झालेल्या अपत्यांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहिल.<br>६) सदर योजनेच्या लाभासाठी एकाच पालकाच्या अपत्य संख्या मर्यादेचे बंधन नाही. तथापि. मेहतर काम करणा-या व्यक्तिचे पुर्नवसन योजनेंतर्गत लाभ मिळाल्यानंतर जन्म झालेल्या अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना सदर योजनेचा लाभ अनुज्ञेय राहणार नाही. | | |
| अन्य अटी | - | | | केंद्र शासनाच्या उपरोक्त दि. ३०/१०/२००३ च्या पत्रासोबतच्या नियमावली प्रमाणे. | | |

३. सदर शिष्यवृत्ती सर्व जाती-धर्माला लागू आहे. ज्या व्यक्ती वरील अस्वच्छ व्यवसायाची कामे करतात त्या व्यक्तींच्या मुलांना सदर शिष्यवृत्ती देण्यात येते. अनुसूचित जातीमध्ये समावेश केलेल्या अस्वच्छ व्यवसाय करणा-या पालकांच्या पाल्यासाठी ही शिष्यवृत्ती जातीच्या दाखल्याच्या आधारे देता येईल. त्यासाठी विदयार्थ्यांच्या पालकाडून रुपये २०/- च्या स्टॅम्प पेपरवर सोबतच्या **परिशिष्ट-अ** प्रमाणे हमीपत्र घेण्यात यावे. तथापि, इतर समाजातील अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या व्यक्तींना अस्वच्छ व्यवसाय करत असल्याबाबतचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील. अशा अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांनी खालील प्राधिकाऱ्यांचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक राहिल. :-

| | | |
|---|---|---|
| १) ग्रामपंचायत क्षेत्र | - | ग्रामसेवक व सरपंच |
| २) नगरपालिका | - | मुख्याधिकारी |
| ३) महानगरपालिका | - | आयुक्त / उपायुक्त/प्रभाग अधिकारी |

४. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती योजने अंतर्गत शाळेकडून प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करण्याकरीता तालुका स्तरावर खालील प्रमाणे समिती गठित करण्यात येत आहे.

| | | |
|---|---|---|
| १) गट शिक्षण अधिकारी | - | अध्यक्ष |
| २) विस्तार अधिकारी (शिक्षण) | - | सदस्य |
| ३) जिल्हा समाजकल्याण अधिकारी कार्यालयातील प्रतिनिधी (समाजकल्याण निरीक्षकापेक्षा कमी दर्जाचा नसावा) | - | सदस्य सचिव |

अ) <u>समितीची कार्यकक्षा :-</u>

१) शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांची छाननी करणे.

२) या शिष्यवृत्तीची केंद्र शासनाच्या उपरोक्त दिनांक ३०-१०-२००३ व दिनांक २१-०१-२००९ च्या पत्रान्वये विहित करण्यात आलेल्या नियमावलीनुसार अर्जांच्या पात्र/अपात्रतेबाबत शिफारस संबंधित समाजकल्याण अधिकारी, जिल्हा परिषद यांचेकडे करणे.

३) अस्वच्छ व्यवसायातील पालकांचे सदर व्यवसाय करीत असल्याचे अद्यायावत प्रमाणपत्र सक्षम प्राधिका-याने दिलेले असल्याची खात्री करणे. अनुसूचित जातीमध्ये समाविष्ठ असलेल्या अस्वच्छ व्यवसाय करणा-या पालकांनी परिशिष्ट "अ" प्रमाणे हमीपत्र दिले असल्याची खात्री करणे.

४) विद्यार्थी वसतिगृहात राहात असल्यास त्याबाबत संबंधित अधिक्षकाचे प्रमाणपत्र असल्याची खात्री करणे.

ब) <u>समितीची कार्यपध्दती :-</u>

१) संबंधित शाळेच्या मुख्याध्यापकामार्फत अस्वच्छ व्यवसायातील पालकांच्या मुलांना शिष्यवृत्ती योजनेंतर्गतचे अर्ज वरील समितीला ऑगस्टमहिन्यात सादर करण्यात येतील.

२) समितीमार्फत सदर अर्जाची छाननी करुन सप्टेंबर महिन्याच्या पहिल्या आठवड्यापर्यंत जिल्हा समाजकल्याण कार्यालयास पाठविण्यात येतील.

३) जिल्हा समाजकल्याण कार्यालयामार्फत सप्टेंबर अखेरपर्यंत मुल्यनिर्धारण करुन आवश्यक तरतूद शाळांना वाटप करण्यात येईल. तसेच अपात्र अर्ज समितीच्या शिफारशी विचारात घेऊन अमान्य करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल.

१५. अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना शिष्यवृत्ती देण्याबाबत केंद्र शासनाच्या सामाजिक न्याय विभागाच्या दिनांक २१/०१/२००९ च्या पत्राची प्रत सोबत जोडली आहे त्यानुसार व यापुर्वी केंद्र शासनाच्या दिनांक ३०/१०/२००३ च्या नियमावलीतील मार्गदर्शक सूचना विचारात घेऊन अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांचे पाल्यांना शिष्यवृत्तीचे वाटप करण्याची कार्यवाही करावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

( एन.आरुमुगम )
सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,
विभागीय आयुक्त, कोकण, पुणे, नाशिक, औरंगाबाद, अमरावती, नागपूर.
सर्व जिल्हाधिकारी.
मुख्य कार्यकारी अधिकारी, सर्व जिल्हा परिषदा.
संचालक, समाजकल्याण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व विभागीय समाजकल्याण अधिकारी.
सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी,
सर्व समाजकल्याण अधिकारी गट-अ, जिल्हा परिषद
निवड नस्ती-मावक-२



जा.क्र. सकसं/शिक्षण/मासाशि/अस्वच्छ/परिपत्रक
०८-०९/का-४/३८९
समाज कल्याण संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, पुणे -१
दि. २६/03/२००९.

प्रति,
(१) विभागीय समाज कल्याण अधिकारी (सर्व)
(२) विशेष जिल्हा समाज कल्याण अधिकारी (सर्व)
(३) समाज कल्याण अधिकारी, गट - अ, जि. प. (सर्व)

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार अस्वच्छ व्यवसायात काम करणाऱ्या पालकांच्या मुलांना भारत सरकार मॅट्रीकपूर्व शिष्यवृत्ती योजनेची नियमावलीत सुधारणा केलेली आहे. या सुधारणा दिनांक १/४/२००८ पासून लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच या शासन परिपत्रकानुसार केलेल्या कार्यवाहीचा अनुपालन अहवाल संचालनालयास सादर करावा.

सह- संचालक (शिक्षण)
समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य, पुणे-१

## परिशिष्ट-अ

**शासन परिपत्रक क्र. इबीसी २००८/प्र.क्र.६२/मावक-२ दि. १७.३.२००९चे परिशिष्ट**

### <u>प्रतिज्ञापत्र</u>

मी ______________________________, राहणार ________ तालुका ________ जि.________

येथील रहिवासी असून माझा मुलगा /मुलगी कु.____________________________ हा/ही ______________

या शाळेत शिकत आहे. माझी जात _______ अशी असून सदर जातीचा अनुसूचित जातीमध्ये समावेश आहे . मी अस्वच्छ व्यवसायाशी परंपरेने संबंध असलेला सफाईगार/गटारांची साफसफाई करणे/शुष्क शौचालयाची स्वच्छता/कातडी सोलणे/कातडी कमावणे इ.परंपरागत अस्वच्छ व्यवसाय करतो. सदर माहिती ही सत्य प्रतिज्ञेवर देत असून, सदर माहिती खोटी आढळून आल्यास असत्य कथनाबद्दल माझ्याविरुध्द दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल,याची मला जाणीव आहे.

स्वाक्षरी

( विद्यार्थ्याचे पालकाचे नाव )